# A Case study of Maharashtra Health Administration and Pradhan Mantri Jan Arogya Yojana with special reference to Marathwada.
# (महाराष्ट्र आरोग्य प्रशासन आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा चीकीस्तक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**SUBMITTED TO**
**SWAMI RAMANAND TEERETH MARATHAWADA UNIVERSITY**
**VISHNUPURI, NANDED, MAHARASHTRA.**

**FOR THE REGISTRATION OF DOCTOR OF PHILOSOPHY IN PUBLIC ADMINISTRATION**
**Under the Faculty of Humanities**

**Submitted by**
**JIVNE KRISHNA DAGADUBA**
**Under the Supervision of**

**Guide**
**DR. DEEPAK SUBHASH WAGHMARE**
**HEAD, Department of Public Administration**
**Pratibha Niketan college, NANDED**

**September- 2022**

**A Case study of Maharashtra Health Administration and Pradhan Mantri Jan Arogya Yojana with special reference to Marathwada.**
**(महाराष्ट्र आरोग्य प्रशासन आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा चीकीस्तक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा)**

प्रस्तावना:

महाराष्ट्र आरोग्य प्रशासन आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा चीकीस्तक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा या केंद्र सरकारच्या आरोग्य पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी व सुविधा याचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे या विषयाच्या माध्यमातून आरोग्य प्रशासनात प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेहा फायद सामान्य व्यक्तीला होतो या अलीकडच्या काळात covid-19 च्या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये आरोग्याचे महत्व वाढलेले दिसून येते ही योजना केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविली जाते केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत 2018 मध्ये सुरू केली आहे.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा माध्यमातून covid-19 अशा परिस्थितीत सामान्य लोकांना जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून या योजनेचा फायदा मिळालेला आहे केंद्र सरकारच्या जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून अनेक योजना राबविल्या जातात परंतु प्रधानमंत्री जन आरोग्य योजना त्यातीलच एक महत्त्वाची आरोग्य संबंधी योजना आहे. खऱ्या अर्थाने या योजनेची अमलंबजवानी प्रभावीपणे झाल्यामुळे आज आरोग्य क्षेत्रात प्रशासकीय व्यवस्थेत आणि covid-19 च्या परिस्थितीत चांगल्या राज्याची म्हणजेच सुशासनाची निर्मिती होताना आपल्या पाहायला मिळते.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागाअंतर्गत या योजनेचा लाभ कितपत झाला याचा अभ्यास करणे मराठवाड्यात एकूण आठ जिल्ह्यांचा समावेश होतो मराठवाड्यातील आयुष्यमान भारत योजना या योजनेच्या माध्यमातून जनकल्याणाच्या कार्यासाठी तासेच सुव्यस्था निर्माण कण्याच्या दृष्टीकीनातून सर्व सामान्य नागरिकांना या योजनेच फायदा होऊन आरोग्याच्या अनेक समस्याचे निराकरण झाले आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना हि प्रति कुटुंबास पाच लाख रुपये एवढी कॅश लेस सुविधा आरोग्य आणि निरोगी जीवनासाठी उपलब्ध करून देते. प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहान अशा दोन्ही प्रकारे आरोग्याला संरक्षण देणे हा उद्देश या योजनेचा आहे.

**समस्या सूत्रान :**

"**महाराष्ट्र आरोग्य प्रशासन आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा चीकीस्तक अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा**"

**संशोधन विषयाचे महत्व:**

भारतात सध्या संसदीय लोकशाही शासन पद्धती हि कल्याणकारी राज्याची संकल्पना अमलात आणण्यासाठी अतिशय महत्वाची आहे त्यामुळे समाजाचा विकास वंचित जातींचा अदिवसी महिला बालक वृद्घ यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व त्यांना संरक्षण प्राप्त करून देण्यासाठी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अतिशय महत्वाची आहे.

भारतात जनकल्याणाची संकल्पना स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आज पर्यंत चाललेली आपल्याला दिसून येते केंद्र आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून जनकल्याण साधण्याचा प्रयत्न केला जातो नागरीकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या योजना आखल्या जातात आणि या योजनांच्या माध्यमातून अनेक नागरिकांना विकासाच्या प्रवाहामध्ये कसे आणता येऊ शकेल या दृष्टिकोनातून प्रयत्न केला जातो त्याचाच एक भाग म्हणून प्रधानमंत्री जन आरोग्य योजना किंवा आयुष्यमान भारत योजना हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग मानता येऊ शकेल आपण पाहतो मागच्या दिड ते दोन वर्षापासून पूर्ण जगभरात covid-19 या संसर्गजन्य रोगाने थैमान घातले होते  अनेक विकसित व विकसनशील देश या संसर्गजन्य रोगांना थांबवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करत आहेत परंतु भारत सरकारच्या आयुष्यमान भारत योजनेचे मार्फत लोकांना आरोग्यासंबंधी एक नवसंजीवनी प्राप्त झालेली दिसून येते.

योजनेच्या माध्यमातून कार्य होत असताना आपल्याला दिसून येते आरोग्या संदर्भात होणारा खर्च हा सर्वसामान्य जनतेला भेडसावत आहे. परंतु आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून लोकांना नवसंजीवनी प्राप्त होताना दिसून येते आर्थिक दृष्ट्या दुर्बल लोकांना म्हणजेच बीपीएल धारकांना आरोग्य विमा प्रदान करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे त्या खालील प्रत्येक कुटुंबासाठी पाच लाखापर्यंत कॅशलेस आरोग्य विमा उपलब्ध करून देण्यात येईल. सुमारे पन्नास कोटी बीपीएल धारक कुटुंब  लोक या योजनेचा लाभ घेण्यास सक्षम असतील भारताचे पंतप्रधान **श्री नरेंद्र मोदी यांनी 14 एप्रिल 2018** रोजी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातून** या योजनेचा शुभारंभ केला प्रामुख्याने या योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकार देशातील सर्व कुटुंबांना पाच लाख रुपयापर्यंत चा आरोग्य विमा प्रदान करेल याचा अर्थ असा की या योजनेस पात्र असणारी कोणतीही गरीब व्यक्ती खाजगी किंवा शासकीय रुग्णालयात पाच लाख रुपया पर्यंत मोफत उपचार घेऊ शकते.

आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून विकासाच्या बाबतीमध्ये एक सकारात्मक पाहून आरोग्य क्षेत्रात टाकलेले दिसून येते याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी आयुष्यमान भारत योजनेची कशी भूमिका असणार आहे याचे आकलन विवेचन या विषयाच्या  माध्यमातून केले जाणार आहे खरेच महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील सर्व घटकांचा अभ्यास करून यामुळे विकासाला कशी चालना मिळालेली आहे लोकांना या योजनेचा फायदा कसा होत आहे त्यातून आरोग्य क्षेत्रात झालेली सुधारणा या अभ्यासात होईल.

**संशोधनाचे उद्धीष्ट :**

कोणतेही संशोधन हे विशिष्ट हेतू किंवा उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केले जात असते जर उद्दिष्ट निश्चित नसेल तर संशोधन भरकटत जाण्याची शक्यता असते आणि उद्दिष्ट हे निश्चित असतील तर संशोधन एका व्यवस्थेमध्ये शास्त्रीय पद्धतीने करता येऊ शकते म्हणून संशोधनाचे उद्दिष्ट निश्चित करणे अतिशय महत्त्वाचे आहे उद्दिष्टाला अनुसरूनच

संशोधन कार्य चालते म्हणून या संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट निश्चित करण्यात आली आहेत.

१) आरोग्य प्रशासनामध्ये प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचा अभ्यास करणे.
२) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील शासकीय व खाजगी संस्थाचा अभ्यास करणे.
३) प्रधान मंत्री जन आरोग्य योजना आरोग्य प्रशासनातील योजनांचा अभ्यास करणे.
४) प्रधान मंत्री जन आरोग्य योजना याचे महत्व स्वरूप उद्धीश्ते व मर्यादा यांचा अभ्यास करणे.
५) प्रधान मंत्री जन आरोग्य योजना अंमलबजावणी मधील प्रशाकीय यंत्रणेचा अभ्यास.

**संशोधनाची गृहीतके :**

कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना त्या विषयाच्या संशोधनासाठी गृहीत कृत्य संशोधन कार्याच्या अगोदर निश्चित करावी लागतात त्या त्या विषयाचे संशोधन सुरुवातीला निवडलेल्या गृहीत का त्यांच्या आधारावर संशोधन कार्य करावे लागते संशोधनाला विषयाचे पूर्वज्ञान असल्याशिवाय तो संबंधित समस्येच्या संशोधनाला न्याय देता येऊ शकत नाही संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्व ज्ञानाच्या आधारे तसेच त्या विषयाच्या विविध पैलूंच्या गृहीत धरलेल्या अभ्यासाच्या आधारे संशोधन आपल्या संशोधन समस्येवर अभ्यासांती संभाव्य उत्तरे शोधावी लागतात तर रस्त्या संशोधनाला सिद्धांताची मांडणी करता येऊ शकते संभाव्य उत्तरांना अनुसरूनच गृहीत कृत्ये निश्चित केली जातात म्हणजेच संशोधन समस्येची संभाव्य उत्तरे विधानाच्या स्वरूपात मांडणे म्हणजेच गृहीत कृत्य होईल असे आपल्याला म्हणता येऊ शकेल कोणत्याही संशोधनातून सत्य शोधून काढण्यासाठी संशोधनाचे अंतिम किंवा शेवटचे सकते हे गृहीत कर त्यावर आधारित असते म्हणून  संशोधानासाठी पुढील ग्रहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१) आरोग्य प्रशासनातील प्रधान मंत्री जन आरोग्य योजना हि जन कल्याणकारी आहे.
२) मराठवाड्यातील नागरिकांना प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच लाभ आहे.
३) विशेषतः महिलाना  या योजनेचा जास्तीत जास्त लाभ झाला आहे .
४) पंत प्रधान मातृ वंदना योजना व जन आरोग्य योजना परस्पर पूरक करतात.

**तथ्य संकलन :**

सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये समस्येची निवड केल्यानंतर प्रस्तुत संशोधन समस्येचा अभ्यास करण्यासाठी आणि संशोधन विषयी संबंधित आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी संशोधन पद्धती निश्चित करावी लागते. तथ्य संकलन प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोताचा उपयोग करण्यात येणार आहे प्राथमिक तथ्य संकलनासाठी अनुसूची व प्रश्नावली तसेच मुलाखती व प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादी

**प्राथमिक स्रोत** ( primary source)

साधनाचा वापर करून आयुष्यमान भारत योजना मधील जे लाभार्थी आहेत लाभार्थी व तसेच ही योजना अमलात आणणारे अधिकारी अशा वेगवेगळ्या दोन प्रकारच्या प्रश्नावली किंवा मुलाखत अनुसूचित तयार करून तथ्य संकलन करण्यात येईल यामध्ये मराठवाडा विभागातील निवडक आरोग्य संस्थांचा अभ्यास करण्यात येईल एकूण मराठवाड्यातील पन्नास आरोग्य संस्थांकडून तसेच 200 प्रत्यक्ष योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांकडून माहिती संकलित करण्यात येईल किंवा मुलाखत अनुसूची च्या माध्यमातून माहिती जमा करण्यात येईल त्याचबरोबर शासकीय अधिकारी त्या क्षेत्रांमध्ये काम करणारे सामाजिक पदाधिकारी वेगवेगळे डॉक्टर जिल्हाधिकारी विभागीय अधिकारी आरोग्य संघटनेने संघटने संबंधी संलग्नित असलेले अधिकारी यांच्या देखील मुलाखत अनुसूची च्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल.

**दुतीय श्रोत्यांमध्ये**(secondary source)

यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाचे आयुष्यमान भारत योजनेत तील योगदान एकूण देशातील या योजनेचा लाभ कशा पद्धतीने देण्यात आला त्याची कार्यपद्धती त्याचबरोबर आरोग्य विभाग केंद्रीय स्तर आरोग्य विभाग राज्यस्तर या वेगवेगळ्या मंत्रालयाकडून प्राप्त होणारी माहिती तसेच या योजनांची एकूणच रूपरेषा ग्रंथालयं पुस्तकांचा वापर शासनाने प्रकाशित केलेल्या आयुष्यमान भारत योजनेचे संबंधीच्या पुस्तिका स्मरणिका वर्तमानपत्रातील लेख साप्ताहिक मासिक ए शासकीय कार्यालयातील माहिती इत्यादी द्वारे तथ्य संकलन करून त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

**नमुना निवड**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करताना यादृच्छिक नमुना (Random sampling) आणि स्तरित नमुना (Stratified sampling) या तंत्राचा वापर करून या विषयाचा अभ्यास केला जाणार आहे मराठवाडा विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील आयुष्यमान भारत योजनेचे लाभार्थी ग्रामीण भागातील लाभार्थी ग्रामीण भागातील आरोग्य विषयक काम करणारी यंत्रणा यासंबंधी असणाऱ्या सर्व घटकांचा अभ्यास यामध्ये केला जाणार आहे.

**श्री यंग** यांनी या पद्धतीचे महत्त्व विशद करताना असे म्हटले की मानवी वर्तन मानवाचे समाजजीवन मानवा वर प्रभाव टाकणारे घटक आणि त्याचा परिणाम यांचा अभ्यास करणे हा सामाजिक संशोधनाचा हेतू आहे मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करण्यात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याचे आणि त्या संबंधीचे उपाय आणि प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून केले जातात

**पार्टन** यांच्या मते समाजातील सर्व घटकांना नमुना निवडीत सामाविष्ट होण्याची ज्या पद्धतीत समान संधी असते त्या पद्धतीला साधा यादृच्छिक नमुना असे म्हणतात त्याचबरोबर स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील यास वर्गीय नमुना निवड पद्धत असे देखील म्हणतात यामध्ये संशोधक हा सर्वप्रथम विषयाच्या अनुषंगाने सर्वप्रथम समस्येच्या सर्व वैशिष्ट्ये यांच्या संदर्भात माहिती प्राप्त करत असतो समाजातील विविध घटकांच्या गुण संदर्भात जेव्हा भिन्नता असते तेव्हा या पद्धतीचा उपयोग केला जातो.

**संशोधन टप्पे** (WORK PLAN)

१) प्रथम वर्ष : भातातील आणि महारष्ट्रातील आरोग्य क्षत्रेतातील शासनाने केलेल्या कार्याचा प्रशासकीय यंत्रणेमार्फत आढावा घेऊन अभ्यास करणे.
२) द्वितीय वर्ष : संशोधन विषयाशी निगडीत तथ्य संकलन आणि प्रत्यक्ष क्षेत्रवर जाऊन कार्य भेटी देणे
३) तृतीय वर्ष : उपलब्ध तथ्यांचे संकलन करून विश्लेषण करणे आणि निष्कर्ष व शिफारशी करणे.

**धोरण निर्मिती साठी प्रस्तावित अभ्यासाची प्रासंगिकता**

भारतात संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेत संसदीय पद्धतीला अतिशय महत्त्व आहे या देशातील जनतेच्या कल्याणाची विकासाची संपूर्ण जबाबदारी या देशाच्या शासन व्यवस्थेवर अवलंबून आहे covid-19 सारख्या परिस्थितीत किंवा आणखी नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात शासन जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करत असते covid-19 परिस्थितीत देखील शासनाने जनकल्याणाच्या उद्दिष्टाला अनुसरुन आयुष्मान भारत योजना सुरुवात केली कारण आरोग्याच्या दृष्टिकोनातून निर्माण झालेली समस्या सोडविण्यासाठी सर्वसामान्य माणसाला ती परवडणारी असली पाहिजे म्हणून शासनाच्या वतीने या योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला भिंतींच्या परिस्थितीत किंवा त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी या योजनेचा फायदा भारतातील जनतेला मोठ्या प्रमाणात झाला भविष्यात देखील आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून आरोग्याच्या दृष्टिकोनातून सर्वसामान्य जनतेला दिलासा देणार देण्यासाठी ही योजना अतिशय महत्त्वपूर्ण अशी आहे या योजनेच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत इन्शुरन्स हा संबंधित नागरिकांना दिला जातो म्हणजे आरोग्याच्या संदर्भात निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयुष्मान भारत योजना अतिशय महत्त्वपूर्ण आहे म्हणून आपल्याला असे म्हणता येऊ शकेल की एकूणच धोरण निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये देखील या योजनेचे महत्त्व सांगता येऊ शकेल covid-19 च्या काळामध्ये जगामध्ये विकसित देशांमध्ये देखील आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या परंतु भारतातील लोकसंख्येची घनता आणि लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून देखील आयुष्मान भारत योजनेचे सारख्या कल्याणकारी योजना मुळे या देशातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली असे आपणाला म्हणता येऊ शकेल.

केंद्र सरकार व राज्य सरकार जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या योजनांची निर्मिती करीत असते सुशासन निर्मितीमध्ये आयुष्मान भारत योजनेची भूमिका विशेष संदर्भात मराठवाडा विभाग महाराष्ट्र या विषयाला अनुसरून अभ्यास करत असताना प्रामुख्याने खरंच आरोग्याच्या क्षेत्रामध्ये या योजनेमुळे चांगल्या व्यवस्थेची निर्मिती होऊ शकते का त्याचा फायदा जनतेला जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून कसा होतो हा या मागचा

अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे या अभ्यासाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारांच्या धोरण निर्मिती मध्ये आपल्याला अनेक बारकाव्यांचा अभ्यास करता येऊ शकेल या अभ्यासाच्या माध्यमातून ही योजना ग्रामीण भागातील जनतेपर्यंत कशा पद्धतीने जाऊ शकते या योजनेमध्ये काय उणीव आहेत ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आणखी काय करता येऊ शकेल किंवा सर्वसामान्य लोकांना या योजनेचा फायदा घेत असताना कोणत्या अडचणी येतात हे देखील आपल्याला या प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून सांगता येऊ शकेल आणि याचाच फायदा भविष्यामध्ये कल्याणकारी योजनांच्या निर्मितीमध्ये करत असताना केंद्राने राज्य सरकारला त्याचा आधार देखील होऊ शकेल.

या प्रबंधाचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने भारतातील केंद्र आणि राज्य सरकारांच्या अनेक योजना जनकल्याणाच्या दृष्टीकोनातून निर्माण करण्यात आलेले असतात त्या मधेच एक महत्त्वपूर्ण केंद्र सरकारची आरोग्य संदर्भात असलेली आयुष्मान भारत योजना आहे या योजनेच्या माध्यमातून covid-19 या परिस्थितीला सर्वसामान्य जनतेला आरोग्याच्या संदर्भात खूप मोठा आधार मिळाला समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून ही योजना सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाची आहे आपण पाहिलं जगामध्ये अनेक विकसित देशांमध्ये covid-19 च्या परिस्थितीत आरोग्य यंत्रणा कोलमडून गेलेल्या दिसून आल्या परंतु भारतासारख्या विकसनशील देशांत आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून सामान्य जनतेला सर्वांगीण विकासासाठी किंवा covid-19 या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आयुष्मान भारत योजनेच्या मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील देखील सर्वसामान्य जनतेला आयुष्मान भारत योजनेचे चा खूप मोठ्या प्रमाणात फायदा मिळाला म्हणून असे म्हणता येऊ शकेल की आयुष्मान भारत योजना ही आरोग्याच्या दृष्टिकोनातूनच त्याचबरोबर समाजाच्या विकासासाठी देखील अतिशय महत्त्वाची योजना आहे या योजनेमुळे समाजाचा तेथील नागरिकांचा विकास होऊ शकतो कारण नागरिकांचे आरोग्य जर चांगले असेल तरच आपल्याला चांगल्या समाजाची निर्मिती करता येऊ शकते व्यक्तींचे आरोग्य चांगले नसेल तर आपण चांगल्या समाजाची निर्मिती करू शकत नाही म्हणून चांगल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून समाजाचा विकास झालेला दिसून येतो.

**प्रकरण रचना :**

१) **प्रस्तावना**
२) **भारतातील आरोग्य यंत्रणा**
३) **आरोग्य क्षेत्रातील महत्वपूर्ण कार्यक्रम**
४) **प्रधान मंत्री जन आरोग्य योजना**
५) **निष्कर्ष आणि शिफारशी**

**संशोधक** **संशोधन मार्गदर्शक**

**कृष्णा दगडूबा जीवने** **दिपक एस वाघमारे**
सहायक प्राध्यापक संशोधन मार्गदर्शक
प्रतिभा निकेतन महाविदयालय, नांदेड

संदर्भ :

१) प्रधान मंत्री जन आरोग्य योजना सर्वांसाठी आरोग्य WWW.MJPJAY.GOV.IN
२) महारष्ट्र टाईम
३) SWAMY'S MANUAL ON ESTABLISHMENT AND ADMINISTRATION - Muthuswamy, Brinda, Sanjeev 2020

4) Hospital Administration and Management A Comprehensive Guide Gupta Joydeep Das